# उस हादसे ने मायूस कर दिया...



गुजरात-गोध्रा दंगल ही भारताची धर्मनिरपेक्ष राष्ट्र संकल्पना मोडीत काढून, हिंदू राष्ट्र होण्याच्या वाटचालीतला महत्त्वाचा धर्मप्रयोग होता. याच दंगलीतील बिल्किस बानो प्रकरण, आपल्या माणुसकीची, सहिष्णुतेची, संवेदनशीलतेची कसोटी होती, ज्यात एक देश म्हणून, समाज म्हणून आपण अपयशी ठरलो. बलात्कारी उजळ माथ्यानं फिरवले-मिरवले जात आहेत आणि पीडितेला मात्र जिवाच्या भीतीनं लपतछपत जगावं लागतंय. यातूनच इथल्या सडलेल्या शासन यंत्रणेची वास्तवता दिसून येते. वेदनेच्या ज्या रस्त्यावरून बिल्किस बानो २१ वर्षे चालत आहेत, त्याचा हिनाकौसर खान यांनी घेतलेला मागोवा.



हिनाकौसर खान

ती शुद्धीवर आली तेव्हा अंगावर एकही कापड नव्हतं. आपण निर्वस्त्र आहोत या जाणिवेनं तिच्या शरीरभराच्या ओल्या जखमा अधिक ठसठसल्या. त्या म्लान अवस्थेत तिनं आजूबाजूला चाचपलं. हाताला जे कापड लागलं त्यानं अंग झाकलं. तिच्या डोळ्यांदेखत तिच्या आई, बहीण, भावांचं मुंडकं उडालेले मृतदेह होते. काहीच तासांपूर्वी तिने तिची तीन वर्षांची लेक दगडावर आपटून मरताना पाहिली होती...तिचं हसतंखेळतं जग एका क्षणात नष्ट झालं होतं आणि एका भयकारी दंगलीची जिवंत दृश्यं तेवढी तिच्यासोबत उरली होती. ती...बिल्किस बानो! २००२ च्या गुजरात-गोध्रा हत्याकांडातून बचावलेली पीडित. सामूहिक बलात्कारानंतर जिवंत उरलेली, रेप सर्व्हायव्हर. आप्तजनांचा मृत्यू पाहिलेली साक्षीदार. आजही ती साधंसुधं सामान्य आयुष्य जगण्यासाठी आसुसलेली आहे. ती पीडित असूनही तिलाच पाठीवर बिऱ्हाड घेऊन लपतछपत गावखेड्यातल्या कानाकोनाड्यात जगावं लागतंय. ती भयमुक्त होऊ शकेल असं वातावरण अद्याप आपला समाज देऊ शकलेला नाही. आजही ती असुरक्षिततेच्या पिंजऱ्यातच आहे. कुणाच्या नजरेत येण्याची भीती तिच्या नजरेत स्पष्ट आहे. केवळ न्याय मिळेल या एवढ्या आशेवर ती तग धरून आहे. हे तग धरणं, लपून जगणं, भीतीचा सतत अनुभव घेणं किती वर्षांपासून आहे ठाऊकंय? गेली २१ वर्षे. गेली एकवीस वर्षे तिला आणि तिच्या कुटुंबाला मोकळेपणानं वावरता आलेलं नाहीये. रामाचा वनवास १४ वर्षांनी तरी संपला, मात्र बिल्किसच्या वनवासाची आवर्तनं अद्याप तरी सुरूच आहेत.

आपण अलीकडं खूप प्रकर्षानं दुहीचं राजकारण आणि विखार अधिक बळावल्याचं अनुभवतोय. अगदी राहण्याची जागा मिळवायची असेल तरी सर्वसामान्य मुस्लिम कुटुंबाला संघर्ष करावा लागतो. मुस्लिम समाजाबरोबरचा आर्थिक व्यवहार खारीज केला जातो,



हातातल्या काळ्या पिशवीत 'बडाय' की 'छोटाय' याची दहशत माजवली जाते, मुस्लिम म्हणून देशभक्ती आणि राष्ट्रवाद सिद्ध करणारे सारे अँटेने सतत सुरू ठेवावे लागतात. त्या साऱ्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बिल्किस बानो कशाच्या बळावर न्यायालयीन लढ्यासाठी धीरानं उभी असेल असं कोडं पडतं. एकवीस वर्षांपूर्वीच्या त्या अमानुष प्रकारानं आजही तिचं कुटुंब प्रभावित होत असेल का? कोषात जात असतील का? या एकुण काळात कशा प्रकारे जगली असेल ती, तिचं कुटुंब? असे प्रश्न सतत डोक्यात भिनत होते. या प्रश्नांची उत्तरं तिच्याशिवाय कोण देऊ शकणार होतं. मग तिच्याशीच संपर्क करायचं ठरलं. बिल्किस बानोपर्यंत पोहोचायचं ठरलं तेव्हा पहिली अडचण ती पोहोच मिळवण्याचीच होती. सतत स्वत:ला बचावत फिरणारी माणसं आपल्याला सहजी भेटतील तरी कशी? अशी अपेक्षा करणंदेखील वेडेपणा नै का! निरनिराळ्या अडथळ्यांचे महिनाभराचे सोपस्कार पार करून अखेर बिल्किस आणि तिचे पती याकूब रसूल यांच्याशी संवाद झाला.

**“दंगल, हादसा, गमावलेलं कुटुंब हे सगळं बाजूला सारून मी तिच्याशी प्रेमानं बोललो. बिल्किसला मी कधीही त्या प्रसंगाविषयी, घटनेविषयी अद्यापही विचारलेलं नाही. तिनं अनेक वेळा एनजीओ, वकील, पत्रकारांना तिची आपबीती सांगितली. पण मी तुझ्यासोबत कुणी काय केलं हे विचारण्याचं धाडस केलं नाही. तिच्या जखमांची उजळणी नको वाटते. उलट तिच्याशी प्रेमानं बोललो. मी तिला आधार देणार नाही तर कोण?”**

ज्या दिवशी फायनली आम्ही बोलत होतो, त्याच दिवशी नेमकं बिल्किस बानो प्रकरणातल्या ११ दोषींपैकी शैलेश चिमनलाल भट्टचे काही फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले होते. २५ मार्चला दाहोद जिल्ह्यातील करमाडी गावात 'हर घर जल' योजनेचा कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमात भाजप खासदार जसवंतसिंह भाभोर आणि आमदार शैलेश भाभोर या भावांसोबत व्यासपीठावर पहिल्या पंक्तीत शैलेश भट्ट उपस्थित होता. विशेष म्हणजे कार्यक्रम शासनानं आयोजित केला होता. बिल्किस प्रकरणातल्या ११ दोषींच्या सुटकेवर अद्याप कोर्टात याचिका प्रविष्ट आहे आणि तरी खुलेआम वावरण्याची त्याची हिंमत होती. बिल्किसनं हे व्हिडिओ पाहिले होते. ती सांगू लागली, “आम्ही आजही भीत भीत जगतोय.

मात्र ज्यांचे दोष सिद्ध झालेत ते उजळ माथ्यानं फिरतात. फार वाईट वाटतं. आपल्यासोबतच इतका अन्याय का व्हावा? बहुत बुरा लग रहा है.” याला जोडतच याकूब म्हणाले, “भट्ट आमच्या मुलीच्या खुनाचा दोषी आहे. व्हिडिओ पाहिला की स्पष्टपणे कळतं की त्यांना कसलीच भीडभाड नाहीये. ते निडरपणे फिरतायेत. व्यासपीठावर मंत्र्यांसोबत आहेत म्हटल्यावर त्यांचं अधिक फावतं. पण अशा वेळी आम्हीच बुचकळ्यात पडतो. आम्हाला आमच्या जिवाची भीती वाटते. मात्र आम्ही न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवून आहोत.”

बिल्किस बानो आणि तिच्या कुटुंबावरील हल्ला हा २००२ च्या गुजरात दंगलीतील सर्वात भयानक गुन्ह्यांपैकी एक होता. २७ फेब्रुवारी २००२ मध्ये गोध्रा शहरातील साबरमती ट्रेनला लागलेल्या आगीवरून दंगल पेटली. या घटनेत ६० हिंदू यात्रेकरूंचा मृत्यू झाला होता. या आगीसाठी मुस्लिमांना दोषी ठरवत, हिंदू जमावाने मुस्लीम वस्त्यांवर हल्ले केले होते. तीन दिवसांत, १००० हून अधिक लोक मरण पावले होती, त्यापैकी बहुतेक मुस्लिम होते. ट्रेनला आग लागल्याच्या आदल्या दिवशी सकाळी, तेव्हा १९ वर्षांची असणारी बिल्किस बानो दुसऱ्या अपत्यासाठी गर्भवती होती. तिचा पाचवा महिना सुरू होता आणि ती तिच्या तीन वर्षांच्या मुलीसह गोध्राजवळील रंधिकपूर नावाच्या गावात तिच्या आईवडिलांना भेटायला गेली होती.



> बिल्किसच्या भावना उचंबळून आल्या होत्या. त्यांच्या म्हणण्यात भर घालत याकूब म्हणाले, "रिहाईचं ऐकल्यावर आम्ही स्तब्ध राहिलो. चकित झालो. एवढी वर्षं जी लढाई आम्ही लढतोय ती एका क्षणात नष्ट झाली. आम्ही रिमिशन हा शब्द आधी कधीच ऐकला नव्हता. ही नेमकी प्रक्रिया काय आहे हेही आम्हाला ठाऊक नाहीये. पण परिस्थिती काहीही राहिली तरी आम्ही एकमेकांसोबत आहोत. एवढाच दिलासा आहे."

बिल्किस सांगते, ‘‘मी स्वयंपाकघरात दुपारचं जेवण बनवत होते. माझी मावशी आणि तिची मुलं धावत आली. त्यांनी सांगितलं की त्यांच्या घरांना आग लागलीय आणि आपल्या सगळ्यांना लगेच इथून निघावं लागेल. आम्ही अंगावरच्या कपड्यानिशी निघालो. पायात चपला सरकवण्याइतकी फुरसतही आम्हाला मिळाली नाही.’’ त्या वेळी बिल्किसबरोबर तिची मुलगी, तिची आई, एक गर्भवती चुलत बहीण, तिची लहान भावंडे, भाची आणि पुतणे आणि दोन प्रौढ पुरुष असे १७ जण सोबत होते. ते आधी गावातल्या सरपंचाकडे लपून राहिले. मग त्यांनी शाळेत आसरा घेतला. मग तिथून बाहेर पडून काही दिवस ते गावोगावी प्रवास करत मशिदींमध्ये आसरा शोधत किंवा हिंदू शेजाऱ्यांच्या दयाळूपणावर दिवस ढकलत होते. ३ मार्चच्या सकाळी, ते जवळच्या गावात जाण्यासाठी निघाले. त्या गावात आपण अधिक सुरक्षित असू असा त्यांना विश्वास वाटत होता. पण काही पुरुषांच्या एका गटाने त्यांना थांबवलं. ती माणसं परिचित होती. तिच्याच गावातली होती. लहानपणापासून ज्यांना पाहत आली होती त्याच माणसांना समोर पाहून जीव खरं तर निर्धास्त झाला होता. पण त्या वेळेस त्यांचं रंगरूप पालटून गेलेलं होतं.

बिल्किस सांगते, ‘‘त्यांनी आमच्यावर तलवारी आणि काठ्यांनी हल्ला केला. माझी मुलगी माझ्या मांडीवर घेतली होती. त्यांच्यापैकी शैलेश भट्टने आणि तिला जमिनीवर फेकून दिलं. तिचं डोकं दगडावर आपटलं. ती जागीच मरण पावली. सगळे ओळखीचे होते. त्यांच्याकडे आम्ही दयेची याचना करत होतो. पण त्यांनी दुर्लक्ष केलं. कपडे फाडले. बलात्कार केला. दोन दिवसांपूर्वीच चुलत बहिणीनं बाळाला जन्म दिला होता. तिच्यावरही बलात्कार करून तिची हत्या केली. तिच्या दोन दिवसांच्या मुलीची हत्या केली. मी वाचले कारण माझी शुद्ध गेली. मी मेले असं वाटून हल्लेखोर निघून गेले. पुढे तीन तास मी शुद्धीत नव्हते.’’ शुद्धीवर आल्यानंतर तिला पहिली अनुभूती झाली ती आपण नग्न आहोत. जवळच पडलेल्या पेटीकोटनं तिनं कसंबसं अंग झाकलं आणि ती त्या ठिकाणावरून टेकडीवर पळून गेली. पण दमूनथकून ती तिथंच झोपली. दुसऱ्या दिवशी तिला जाग आली तेव्हा तिचा घसा कोरडा पडला होता. तिनं थोडी शोधाशोध केली तर तिला एक हँडपंप दिसला. एका आदिवासी महिलेनं तिला कपडे दिले. बिल्कीसला एक पोलिस अधिकारी दिसला. तिनं त्याच्याकडे मदतीची विनंती केली. त्याने तिला लिमखेडा पोलिस ठाण्यात नेले. या गुन्ह्याची बिल्किस एकमेव साक्षीदार होती. पण तिची तक्रार तिथल्या हेड कॉन्स्टेबलने घेतली नाही. उलट तिला मदत शिबिरात पाठवण्यात आलं. शिबिरात, तिच्या पतीला ती भेटली. याकूब सांगतात, ‘‘दंगल, हादसा, गमावलेलं कुटुंब हे सगळं बाजूला सारून मी तिच्याशी प्रेमानं बोललो. बिल्किसला मी कधीही त्या प्रसंगाविषयी, घटनेविषयी अद्यापही विचारलेलं नाही. तिनं अनेक वेळा एनजीओ, वकील, पत्रकारांना तिची आपबीती सांगितली. पण मी तुझ्यासोबत कुणी काय केलं हे विचारण्याचं धाडस केलं नाही.

> "२१ वर्षं आयुष्याला धक्का देत, टेकू देत जगतेय. मला सामान्य चढउतारांचं, कष्टाचं, कदाचित गरिबीतलंही साधं आयुष्य पण मनासारखं जगायला अधिक आवडलं असतं. भीती, दडपण, दहशतीनं आयुष्य कायम कोंडलेलं राहिलं." आयुष्यातली २१ वर्षे करपल्यानंतरही बिल्किस धकाधकीच्या का होईना, साध्या शांत आयुष्याची वाट पाहतेय.



तिच्या जखमांची उजळणी नको वाटते. उलट तिच्याशी प्रेमानं बोललो. मी तिला आधार देणार नाही तर कोण?''

बिल्किस बानोचा न्यायासाठीचा लढा दीर्घकाळ आणि भयानक राहिला. काही पोलिस आणि राज्य अधिकाऱ्यांनी तिला धमकावण्याचा प्रयत्न केला, पुरावे नष्ट केले आणि शवविच्छेदन न करता मृतांना पुरण्यात आले. या गोष्टींचं सुदैवानं चांगलं दस्तऐवजीकरण झालंय. तिची तपासणी करणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलं की, तिच्यावर बलात्कार झाला नाही आणि तिला जिवे मारण्याच्या धमक्याही आल्या. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण सीबीआयकडे सोपवल्यानंतर २००४ मध्ये या प्रकरणात पहिली अटक झाली. गुजरातमधील न्यायालये तिला न्याय देऊ शकली नाहीत हे सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आणि तिचा खटला मुंबईला हस्तांतरित केला. कोर्टात सहा पोलिस अधिकारी आणि एका सरकारी डॉक्टरसह १९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर बिल्किसची केस शोभा गुप्ता या वकिलांनी लढवली.

२१ जानेवारी २००८ रोजी १३ पुरुषांना बलात्काराच्या आरोपात दोषी ठरवण्यात आले. त्यापैकी ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र दोषींनी याविरुद्ध अपील केले. शेवटी, मे २०१७ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुंबई विशेष न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सकाराला बिल्किसला ५० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे निर्देश दिले. तिला नोकरी आणि घरही देण्याची व्यवस्था करण्याचा आदेश दिला. न्यायालयीन चौकटीत तरी तिला न्याय मिळाला असं म्हणावं तर तिच्यावर आणखी एक नामुष्की ओढवली. गुजरात सरकारने दोषींना जन्मठेपेची शिक्षा माफ करण्याच्या अर्जाला हिरवी झेंडी देणाऱ्या एका पॅनलची स्थापना केली. १५ ऑगस्ट २०२२ रोजी गोध्रा सब-जेलमधून अकराच्या अकरा दोषींची सुटका करण्यात आली. सुटकेनंतर त्यांची आरती ओवाळून स्वागत करण्याचा प्रकारही घडला.

बिल्किस सांगते, "दोषींना मुक्त करण्याच्या निर्णयानं आम्हाला अधिक हवालदिल केलं. हा निर्णय अन्याय्य आहे. माझं कुटुंब आणि आयुष्य उद्ध्वस्त करणारी माणसं पुन्हा मोकाट आहेत हे ऐकल्यावर त्यावर काय म्हणावं हेच मला समजेना. मी अजून सुन्न आहे. एखाद्या महिलेसाठी न्याय अशा तऱ्हेनं कसा काय मिटेल. मी आपल्या सर्वोच्च न्यायालयावर विश्वास ठेवून होते. इथल्या व्यवस्थेवर माझा विश्वास होता. हळूहळू मी माझ्या आघातांसह जगणं शिकू लागले होते. याच आयुष्यात सर्वसामान्य जीवन शोधत होते. पण अशा तऱ्हेनं दोषी ठरलेल्या गुन्हेगारांच्या सुटकेनं माझी मन:शांती हरवली. भयमुक्त आणि शांतिपूर्ण जगण्याचा माझा अधिकार आहे. तो मला कधी मिळणारे? त्यामुळंच आम्ही त्यांच्या सुटकेविरूद्ध याचिका दाखल केली आहे.'' बिल्किसच्या भावना उचंबळून आल्या होत्या. त्यांच्या म्हणण्यात भर घालत याकूब म्हणाले, "रिहाईचं ऐकल्यावर आम्ही स्तब्ध राहिलो. चकित झालो. एवढी वर्षं जी लढाई आम्ही लढतोय ती एका क्षणात नष्ट झाली. आम्ही रिमिशन हा शब्द आधी कधीच ऐकला नव्हता. ही नेमकी प्रक्रिया काय आहे हेही आम्हाला ठाऊक नाहीये. पण परिस्थिती काहीही राहिली तरी आम्ही एकमेकांसोबत आहोत. एवढाच दिलासा आहे.'' हे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे.

न्याय मिळवण्यासाठी कोर्टकचेऱ्यांच्या पातळ्यांवर संघर्ष समजत होता मात्र त्याच वेळी त्यांच्या वैयक्तिक स्तरावरचं जगणं कसं असेल, घटना ताजी होती त्या वेळेसचा काळ कसा असेल याविषयी प्रश्न सतावत होते. त्याबाबत त्यांना विचारलं तेव्हा बिल्किसला यावर बोलणं आत्ताही अवघड गेलं. याकूबच म्हणाला, ‘‘घटना घडली तेव्हा आम्ही आमच्या जवळच्या नातेवाइकांनाही गमावलं होतं. पोटच्या मुलीला गमावलं होतं. शिवाय बिल्किसवरचा प्रसंग. सुरुवातीची दोनेक वर्षं तर बिल्किसला काहीही सुधरत नव्हतं. ती खूप गहिऱ्या मानसिक धक्क्यात होती. तिचं भान हरपलेलं होतं. पण आम्ही कुटुंबीयांनी तिला खूप आधार दिला. प्रेम दिलं त्यामुळं ती खंबीर होऊ शकली. तू खंबीरपणे उभी राहणार नाही तर लढणार कसं, असा सवाल तिला करायचो. हळूहळू तिनं स्वत:ला सावरलं. आज विचार करताना वाटतं त्या वेळेस मी तिच्यासोबत उभा राहिलो नसतो तर काय झालं असतं. पण आम्ही एकमेकांच्या सोबत होतो. माझे कुटुंबीयदेखील बिल्किसच्या पाठिशी उभे राहिले. त्यांनी तिला कधीही काही प्रश्न केले नाहीत. कुटुंबात तिला कायम तिचा सन्मान मिळत राहिला. त्यात कुठलीच हयगय कुणीही केली नाही. २००४ मध्ये केस जेव्हा सीबीआयकडे वर्ग झाली तेव्हा कुठं ती होशमध्ये आली. केससाठी आपण जगावं, लढावं असं कुठं तिला वाटू लागलं.’’ बिल्किस एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे लक्ष वेधते. घर ही प्रत्येकाला स्थिरता देणारी गोष्ट. तुम्ही बिऱ्हाडच पाठीवर ठेवून नवं गाव, नवा प्रदेश शोधणं वेगळं, पण केवळ लोकांच्या नजरेपासून वाचण्यासाठी पळणं वेगळंय. ती म्हणते, ‘‘खूप विचित्र जगणं राहिलंय. एका ठिकाणी घर बसवता आलं नाही. आजपर्यंत आम्ही माझ्या आईवडिलांचं घर, घराची स्थिती बघायला त्या गावी गेलोच नाही कारण त्याच गावात गुन्ह्यातले दोषीदेखील येतात. त्यामुळं अजूनही गावाकडे फिरकण्याची हिंमत नाही झाली. एकाच ठिकाणी आम्हीदेखील घर करून टिकलो नाही कारण घराची माहिती झाली की धमक्या सुरू व्हायच्या. जिवे मारण्याच्या धमक्या यायच्या. काही वेळा अफवा पसरायच्या. या सगळ्याला वैतागून आम्ही चार-सहा महिने झाले की घर बदलतो, इतकी दहशत आजही मनात आहे.’’

दरवेळेला नव्या ठिकाणी बिऱ्हाड घेऊन जायचं. पण मग कुठल्या वस्त्यांमध्ये त्यांना सामावून घेतलं जात असेल? दंगलीच्या पार्श्वभूमीवर तर कदाचित मुस्लिम वस्त्याच त्यांना जवळच्या वाटत असणार असं वाटत होतं. तेच वास्तव होतं हे बिल्किसच्या उद्‌गारातून स्पष्ट होतं. ती सांगते, ‘‘बहुतांश मुस्लिम वस्त्यांमध्ये आम्ही घर पहायचो. आम्ही आमच्या परिस्थितीविषयी, न्यायालयीन लढ्याविषयी काही वेळा घरमालकांशी बोलयचो, काही वेळा नाही. बहुतेक वेळा नाहीच. तरी नंतर लोकांना माध्यमं, वर्तमानपत्रं इथून माहिती व्हायचं. ते साहजिकही होतं. काही जण विचारणा करायचे त्यावरून तर काही जण कानाडोळा. उलट बहुतांश समाजानं पाठिंबा दिला. कसल्याही प्रकारची हेटाळणी नाही केली. त्याचा आम्हाला खूप आधार झाला.’’

अशा पद्धतीच्या घटनांचा मनावर काय परिणाम होत असेल याची कल्पनाच न केलेली बरी असा विचार मनात वारंवार येत होता. एका प्रसंगानं त्यांचं आयुष्य केवढं प्रभावित झालं हे उघडच होतं. याकूब म्हणाला, ‘‘एका हादश्यानं आमच्या आयुष्याचा कायापालट केला. जे जे म्हणून त्यानंतर वाट्याला आलं त्यात स्थैर्य या गोष्टीची कमतरताच राहिली. सततची फिरस्ती सुरू झाली. कामधंदा करू शकलो नाही. जिथं जाऊ तिथं तात्पुरतं काही छोटंमोठं काम करावं लागायचं आणि गुजारा करावा लागयचा. दर चार-सहा महिन्यात घर बदलण्याचा परिणाम मुलांवरही झाला. सतत लपून राहणं वाट्याला आलेलं. मुलांना वारंवार शाळा बदलावी लागायची. नव्या ठिकाणी नव्या शाळेत प्रवेश घ्यायचा. मध्यातून शाळेत प्रवेश घ्यायचा म्हटल्यावर प्रवेश मिळणं अवघड व्हायचं. पण काही ठिकाणी शाळाप्रमुखांना परिस्थिती पटवून द्यावी लागायची. मात्र त्यानंतर प्रवेश मिळायचा. तरी अखंडितपणे, अबाधितपणे त्यांना शिक्षण नाहीच मिळालं किंवा अजूनही, अनेकदा तर काही भयंकर प्रसंग घडले, धमक्या आल्या तर आम्हीच मुलांना शाळेत पाठवत नाही. त्यातही कित्येक खाडे होतात, मुलं मात्र ते सोसत आहेत.’’

बिल्किस-याकूबला चार मुली व एक मुलगा आहे. मुलांसमोर हा विषय निघतो का, असं विचारलं तेव्हा बिल्किसने नकारार्थी उत्तर दिलं. ‘‘स्पेसिफिकली अशी कधीच चर्चा झाली नाही. मुलं जेव्हा मोठी होत होती तेव्हा त्यांना आडोसपडोसमधून मम्मीबरोबर काय घडलंय ते कानावर येत होतं. घरात सतत वकील, पत्रकार किंवा कुणी अधिकारी मंडळी यायचे, त्यांच्याशी चर्चा घरातच व्हायच्या. हे सारं मुलं बघत होती. मीडिया, सुनावणी हे सगळं मुलं पाहत होती. त्यांना वेगळं बसवून काहीही सांगावं लागलं नाही. मात्र ते सर्वसामान्य मुलासारखं आयुष्यही जगू शकत नाहीत. आता मोठी मुलगी कॉलेजात जाते. तिला कुणासोबतही जास्तीची मैत्री नकोय. कारण लहानपणापासूनच मुलं अनुभवताहेत. कुणी काही विचारपूस केली, टॉन्ट केला तर ते हाताळत बसण्यापेक्षा त्यांना आम्ही गप्प राहण्याचा संस्कार दिलाय. गप्प राहा.

मैत्री केली, खूप मिळूनमिसळून राहाल तर उद्या कुणी काही बोललंच तर आपण उत्तर देण्याच्या भानगडीत पडू नका हाच सल्ला राहतो. अर्थात अशी चुप्पी साधायला सांगणं हे चूक आहेच पण पर्याय नाही.'' मुलांच्याही आयुष्यावर त्या घटनेचा प्रभाव होताच. बिल्किस-याकूबप्रमाणेच मुलांच्या वाटचं सामान्य आयुष्यही हिरावलं गेलं. मात्र या सगळ्या प्रक्रियेत इतक्या धमक्या येत होत्या तरी केस जारी ठेवण्याची हिंमत कुठून आली असेल हा प्रश्न मनात येत होता, याकूब म्हणाला, ''जिवे मारण्याची धमकी यायची भीती वाटायची. सुरुवातीला खूप दबाव यायचा. दडपण्याचे प्रयत्न झालं पण नंतर मनात आलं आपलं कुटुंबच गमावलंय. आता हरण्यासाठी-गमावण्यासाठी काय उरलंय तर आता इथून पुढचं आयुष्य लढूयात. न्याय मिळावा म्हणून उभं राहू असं वाटलंच. तुमच्याकडे गमावण्यासाठी काहीच उरत नाही तर भीतीही संपते तेच आमचं झालं. शिवाय देशभरातून लोकांचा पाठिंबा मिळत होता. लोक आमच्यावतीनं बोलत होते, आम्हाला न्याय मिळावा म्हणून त्यांच्यापरीनं झटत होते याही गोष्टीतून हिंमत मिळत गेली. यातूनही आमची हौसलाअफजाई व्हायची. लोकांचं कौतुक वाटायचं. ऊर्जा मिळायची. अजूनही लोक सोबत आहेत. निराश वाटण्यासारख्या परिस्थितीत लोकांकडून मिळणाऱ्या सपोर्टनं धरून ठेवलं.'' शासनाकडून बिल्किस बानोला नुकसानभरपाईची रक्कम मिळाली, मात्र घर वा नोकरीची व्यवस्था अद्याप झाली नाही. बिल्किस सांगते, ''नोकरी माझ्या पतीला मिळावी म्हणून आम्ही शासनाला विनंती केली. मी स्वत: घराबाहेर पडून नोकरी करू शकणार नाही. माझ्या पतीकडेही कामाचं स्थैर्य नाहीये आणि आमचा कौटुंबिक निर्णय आहे की पतीला नोकरी मिळावी. मात्र यावर कुठल्याच प्रकारचं उत्तर, हालचाल घडली नाही. घराच्याबाबतही तेच. आम्ही अजूनही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीची वाट पाहतोय. आता मुलंही मोठी होत चाललीयेत. त्यांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा तर आधीच झालाय, किमान इथून पुढं तरी ते सुरळीत व्हावं असं आम्हाला वाटतंय. त्यांनी भरपूर शिकून मोठं व्हावं असं आम्हाला फार वाटतंय. आयुष्य नव्यानं सुरू होईल असं वाटत होतं, पण दोषींना शिक्षा पूर्ण होण्याआधीच मुक्त केल्यानं फार गहरा सदमा पोचलाय. मुळातच नाशिकहून गुजरातला ट्रान्सफर झाले, तेव्हा ते सतत पॅरोलवर असायचे. शिक्षा भोगण्यापेक्षा ते जास्तीत जास्त घरीच असायचे. मग त्या दिवसांत ते आपल्याविरुद्ध आणखी काही बगावत करतील का, आपल्याला मारून टाकतील का, ही भीती असायचीच. दिल के अंदर खतरा रहता था. आता पुन्हा न्यायालयीन लढा आहेच.''

इतका सगळा बाका प्रसंग ओढवल्यावर कुणीही खचून जाईल. शिवाय सततच्या धमक्या, जिवे मारण्याची भीती, वेगवेगळ्या तऱ्हेनं कोंडी करणं या सगळ्याला पुरून बिल्किस आणि तिचं कुटुंब आजही उभं आहे. आपण हा लढा केवळ स्वत:साठी नव्हे तर देशातल्या प्रत्येक महिलेसाठी लढतोय याची जाण बिल्किसला आहे. ती म्हणते, ''माझं जिंकणं हे केवळ माझं असणार नाही तर माझ्या पाठीशी उभ्या राहिलेल्या तमाम जनतेचा विजय असेल. त्याहून महत्त्वाचं म्हणजे भलेही दीर्घकाळ न्यायालयीन लढा चालेल, मात्र न्याय मिळू शकतो हा विश्वासही अबाधित राहणं तितकंच मोलाचं ठरणारं आहे. मात्र आता ज्या प्रकारे मुक्तता करण्यात आली हा अन्याय आहे. गुन्हेगारांना सोडणं म्हणजे पीडितेला पुन्हा बंदी केल्यासारखं आहे. देशातल्या इतर महिलांना अशा तऱ्हेनं बंदी होण्याची वेळ येऊ नये, कुठल्याही भय आणि चिंतेशिवाय जगता यावं यासाठीच पुन्हा एकदा याचिकेच्या माध्यमातून उभे आहोत. गुन्हेगारांनी त्यांची शिक्षा भोगावी या प्रयोजनासाठी आम्ही लढत राहणार आहोत. शिक्षा भोगण्याआधीच त्यांना सोडलं ही फारच क्लेशदायी बाब आहे. सुदैवानं माझं संपूर्ण कुटुंब माझ्यासोबत आहे.'' न्यायालयीन लढा, याचिका, सुनावण्या या सगळ्याच्या पलुकडे जाऊन बिल्किस मात्र एक शांततामय सामान्य आयुष्याचं स्वप्न पाहतेय. साधं-सोपं आयुष्य जगायला मिळावं इतक्या मूलभूत अपेक्षेच्या पूर्ततेसाठी गेली २१ वर्षे ती वाट पाहतेय. इतका प्रदीर्घ इंतजार...! समाज म्हणून तिला तिच्या कुटुंबाला तेवढी सुरक्षितता, तितकी हमी आपण तिला देऊ शकलो नाही म्हणूनच ती आजही दडपून, ठावठिकाणा दडवून जगतेय. ''उस हादसे ने बहुत मायूस कर दिया...ते घडलं नसतं तर मी माझं साधं-सरळ आयुष्य जगू शकले असते. गेली २१ वर्षं आयुष्याला धक्का देत, टेकू देत जगतेय. मला सामान्य चढउतारांचं, कष्टाचं, कदाचित गरिबीतलही साधं आयुष्य पण मनासारखं जगायला अधिक आवडलं असतं. भीती, दडपण, दहशतीनं आयुष्य कायम कोंडलेलं राहिलं.'' आयुष्यातली २१ वर्षे करपल्यानंतरही बिल्किस धकाधकीचं का होईना, साध्या शांत आयुष्याची वाट पाहेतय. ते तिला कधी मिळेल याचं उत्तर कुणाकडं आहे? कुणाही प्रसंगातल्या पीडितेला न्याय मिळेल आणि बरं वाटेल असा समाज तरी आपण घडवणार आहोत का? प्रश्नाचा गुंता सोडवता येत नाही म्हणून आपल्याला पाठ नाही फिरवता येणार...इतकं नक्की!

**(लेखिका मुक्त पत्रकार असून आरोग्य संज्ञापन क्षेत्रात कार्यरत आहेत.)**

**greenheena@gmail.com**

**(लेखासाठी सहकार्य -अब्दुल रज्जाक अब्दुल मज्जीद मन्सुरी)**